**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत रोपवाटीकांना "डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोपवाटीका" असे नाव देण्याबाबत.**

**महाराष्ट्र शासन**
**नियोजन विभाग (रोहयो)**
**शासन निर्णय क्र. मग्रारो-२०१२/ प्र.क्र. ५१ / रोहयो- १० अ**
**मंत्रालय, मुंबई- ४०० ०३२**
**दिनांक- ११ एप्रिल, २०१२**

वाचा:- १) नियोजन विभाग शासन निर्णय क्र. दि. मग्रारो २०११/ प्र.क्र. १२९/रोहयो- १०अ, दि. ५/१२/२०११
२) नियोजन विभाग शासन निर्णय क्र. दि. मग्रारो २०१२/ प्र.क्र. १/ रोहयो- १०अ, दि. १/३/२०१२

**शासन निर्णय :-**

महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विविध यंत्रणांमार्फत तसेच ग्रामपंचायतीमार्फत रोपवाटीका तयार करण्याबाबत वरील शासन निर्णयाद्वारे आदेश देण्यात आले आहेत. या आदेशांप्रमाणे तयार करण्यात आलेल्या रोपवाटीकांना डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे नाव देण्याचा प्रस्ताव शासनाच्या विचाराधीन होता. यासंदर्भात महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेच्या निधीतून विविध यंत्रणा व ग्रामपंचायतीमार्फत केल्या जाणाऱ्या रोपवाटीकांना **"डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोपवाटीका"** असे नाव देण्याबाबत शासनाने निर्णय घेतला आहे.

सदर आदेश दिनांक १४ एप्रिल, २०१२ पासून तात्काळ लागू करण्यात येत आहेत. महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेंतर्गत विविध यंत्रणांमार्फत तसेच ग्रामपंचायतीमार्फत तयार करण्यात आलेल्या सर्व रोपवाटीकांच्या प्रकल्प स्थळावर यासंबंधीचा नाम फलक लावणे बंधनकारक राहील. नाम फलकाचा नमुना सोबतच्या " परिशिष्ट - अ " मध्ये दिला आहे.

सदर शासन निर्णय महाराष्ट्र शासनाच्या www.maharashtra.gov.in या वेबसाईटवर उपलब्ध करण्यात आला असून त्याचा संगणक संकेतांक क्र.२०१२०४१११०१९५८४५८००१ असा आहे.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने.

11/4/2012

**(श्रीमती आर. विमला)**
**उप सचिव**

**प्रति,**

मा. राज्यपाल यांचे खाजगी सचिव.
मा. मुख्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
सर्व मंत्री, राज्यमंत्री यांचे खाजगी सचिव.
मुख्य सचिव, महाराष्ट्र शासन.

प्रधान सचिव, (कृषी) कृषी व पदुम विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
प्रधान सचिव, (वने) महसुल व वन विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२
सर्व विभागीय आयुक्त.
आयुक्त (कृषि),महाराष्ट्र राज्य, पुणे.
मुख्य अभियंता, लघुपाटबंधारे (स्थानिक स्तर), पुणे.
प्रधान मुख्य वन संरक्षक, महाराष्ट्र राज्य, नागपूर
संचालक, सामाजिक वनीकरण. महाराष्ट्र राज्य,पुणे.
संचालक, भुजल सर्व्हेक्षण व विकास यंत्रणा, पुणे.
उप सचिव (रोहयो समिती), महाराष्ट्र विधानमंडळ सचिवालय, विधानभवन, मुंबई.
सर्व जिल्हाधिकारी (बृहन्मुंबई वगळून)
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी,जिल्हा परिषद.
महासंचालक, अर्थ व सांखिकी संचालनालय, मुंबई.
महासंचालक, माहिती व जनसंपर्क संचालनालय, मुंबई. (प्रसिध्दी करीता),
विभागीय कृषि सहसंचालक,ठाणे,पुणे,कोल्हापूर,नाशिक,औरंगाबाद,अमरावती,नागपूर, लातूर.
सर्व अधीक्षक कृषि अधिकारी,
सर्व सहसंचालक, सामाजिक वनीकरण वृत्ते, नागपूर/अमरावती/औरंगाबाद/नाशिक/पुणे/ कोंकण वृत्त ठाणे.
सर्व मुख्य वन संरक्षक/सर्व उप वनसंरक्षक.
सर्व विभागीय वन संरक्षक/सर्व विभागीय मृदसंधारण अधिकारी.
सर्व उपसंचालक, सामाजिक वनीकरण विभाग,
सर्व प्रकल्प संचालक, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा,
महालेखापाल (लेखापरिक्षा), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
महालेखापाल (लेखा व अनुज्ञेयता), महाराष्ट्र-१ व २, मुंबई व नागपूर,
सर्व जिल्हा कोषागार अधिकारी,
सर्व मंत्रालयीन विभाग,
कक्ष अधिकारी, संग्राम कक्ष, ग्रामविकास व जलसंधारण विभाग (महाऑनलाईन वेबसाईटवर वितरीत करण्यासाठी )
सर्व कक्ष अधिकारी, रोहयो प्रभाग व जलसंधरण विभाग.
निवडनस्ती रोहयो- १० अ

<u>परिशिष्ट - अ</u>

**महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजनेअंतर्गत "डॉ.बाबासाहेब आंबेडकर रोपवाटीका" प्रकल्प स्थळावर लावण्याच्या फलकाचा नमुना :-**

| | |
|---|---|
| १) योजनेचे नाव | :- **महात्मा गांधी राष्ट्रीय ग्रामीण रोजगार हमी योजना :** (योजनेचा लोगो) |
| २) कामाचा प्रकार | :- **"डॉ. बाबासाहेब आंबेडकर रोपवाटीका"** |
| ३) रोपवाटीका धारक | :- अ) शासकीय विभाग असल्यास विभागाचे नाव<br>ब) ग्रामपंचायत असल्यास ग्रामपंचायतीचे नाव |
| ४) रोपवाटीकेचे क्षेत्र | :-........................ हेक्टर / एकर |
| ५) रोपनिर्मिती क्षमता | :- ........................ (रोपांची संख्या) |
| ६) अंदाजे खर्च | :- ........................ रू. |